रविवार दि.२ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१३८ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# अर्थसंकल्पच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला नक्की दिलासा मिळेल–अजित पवार

## देशाच्या निर्मितीत महाराष्ट्र आपली भूमिका बजावेल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाचे महाराष्ट्र राज्याच्या माध्यमातून स्वागत करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित पवार यांनी या संदर्भात एक सविस्तर पोस्ट करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्मला सितारामन यांचे जाहीर आभार मानले आहेत. देशांच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्र नक्कीच आपले योगदान देईल, असा विश्वास देखील अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

या संदर्भात अजित पवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या तरतुदींची आकडेवारीसह माहिती दिली. या माध्यमातून महाराष्ट्राला होणाऱ्या फायद्यांचा देखील त्यांनी उल्लेख केला आहे. अर्थसंकल्पच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला नक्की दिलासा मिळेल आणि देशाच्या निर्मितीत महाराष्ट्र आपली भूमिका बजावेल, असा विश्वास देखील अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

मी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात घेतलेल्या निर्णयांचं स्वागत करतो. केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्रातील पायाभूत प्रकल्पांना भरीव निधी मिळाला असून त्याबद्दल प्रधानमंत्री मा.श्री. नरेंद्र मोदी साहेब आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे जाहीर आभार मानतो. बारा लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करुन मध्यमवर्गीय देशवासियांना मोठी भेट दिली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी टीडीएस मर्यादा ५० हजारांहून १ लाख करण्याचा निर्णयही स्वागतार्ह आहे. कॅन्सर आणि इतर गंभीर आजारांवरील ३६ जीवनावश्यक औषधांवरील सीमाशुल्क संपूर्ण माफ केल्यानं ही औषधं स्वस्त होणार आहेत.केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला एमयुटीपी–३ प्रकल्पासाठी १४६५ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. पुणे मेट्रोसाठी ८३७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुळा मुठा नदी संवर्धनासाठी जायकांतर्गत २३० कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. मुंबई–अहमदाबाद हायस्पीड रेल्वेच्या चार प्रकल्पांसाठी ४ हजार ३ कोटी, मुंबई–अहमदाबाद हायस्पीड रेल्वे – प्रशिक्षण संस्थेसाठी १२६ कोटी ६० लाख, मुंबई मेट्रोसाठी १६७३ कोटी ४१ लाख, महाराष्ट्र ग्रामीण दळणवळण सुधारणांसाठी ६८३ कोटी ५१ लाख, महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क–मॅग्नेट प्रकल्पासाठी ५९६ कोटी ५७ लाख, ऊर्जा संवर्धन व लिफ्ट इरिगेशन प्रकल्पासाठी १८६




कोटी ४४ लाख, इंटीग्रेटेड ग्रीन अर्बन मोबिलिटी प्रकल्प मुंबईसाठी ६५२ कोटी ५२ लाख, सर्वसमावेशक विकासासाठी आर्थिक क्लस्टर जोडणी कामांसाठी १०९४ कोटी ५८ लाख रुपयांचा निधी महाराष्ट्राला मिळाला.देशातील शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, युवक, विद्यार्थी, सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून सादर झालेल्या अर्थसंकल्पातून देशातल्या प्रत्येक व्यक्तीला विकासाची संधी, प्रत्येक समाजघटकाला बळ मिळणार आहे. देशाला आर्थिक महासत्ता आणि विकसित राष्ट्र बनण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून महाराष्ट्राच्या पायाभूत विकासाला बळ मिळणार आहे. देशात तयार होणारे कपडे, चामड्याच्या वस्तू, मत्स्योत्पदनांवरील शुल्क कमी झाल्यानं महाराष्ट्राला त्याचा फायदा होईल, असा विश्वास आहे.शेतकरी, महिला, युवक, गरीब वर्गासाठी विविध योजनांची घोषणा केली आहे. महिलांच्या कौशल्याविकास प्राथम्याचा विषय आहे. पंतप्रधान धनधान्य योजनेंतर्गत शेती उत्पादकता वाढ, शेतमाल साठवणूक सुविधा, सिंचन आणि क्रेडीट सुविधांवर भर देण्यात येणार असून शंभर जिल्ह्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. त्याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल. कापूस आणि डाळींच्या उत्पादनवाढीसंदर्भात घेतलेले निर्णयही महाराष्ट्राच्या फायद्याचे आहेत. किसान क्रेडीट कार्डची मर्यादा ५ लाख करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. देशाला जगाचे फूड बास्केट बनवण्यात महाराष्ट्राची भूमिका प्रमुख असेल.महाराष्ट्र हे शिक्षण, उच्च आणि तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रात अग्रेसर राज्य आहे. सरकारी शाळांमध्ये ५ लाख अटल टिंकरिंग लॅब स्थापन करणं, शाळा आणि आरोग्य केंद्रांना ब्रॉडबँड सेवा पुरवणं, भारतीय भाषांमध्ये पुस्तकं उपलब्ध करुन देणं, आयआयटीमधील तसंच मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थी संख्या आणि सुविधा वाढवण्याचा फायदा राज्यातील युवकांना निश्चितपणे होईल. ऑनलाईन गिग वर्कर्ससाठी ओळखपत्र तयार करून त्यांना ई–श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचा निर्णय महत्वाचा असून सुमारे १ कोटी गिगवर्कर्सना पीएम जन आरोग्य योजनेअंतर्गत आरोग्य सेवा पुरवण्यात येणार आहे. हे सर्व निर्णय विद्यार्थी, युवक, समाजातील सामान्य घटकांना केंद्रस्थानी ठेवून घेण्यात आले आहेत.न्यूक्लिअर एनर्जी मिशनच्या माध्यमातून २०४७ पर्यंत १०० गिगावॅट ऊर्जानिर्मितीचं लक्ष्य देशाला महासत्तेकडे नेणारं महत्वाचं पाऊल आहे. शहरांमध्ये सुधारणा राबवण्यासाठी सरकार १ लाख कोटींचा अर्बन चॅलेंज फंड निर्माण करण्याचा निर्णयही तितकचा महत्वाचा आहे. देशात १२० ठिकाणी उडान योजना राबवण्याचा त्यातून हवाई प्रवासी संख्या ४ कोटींवर नेण्याचा संकल्प आहे. देशातील ५२ प्रमुख पर्यटन स्थळांच्या विकासाचंही धोरण आहे. ही विकसित राष्ट्रासाठीची, महासत्तेच्या वाटेवरील आधुनिक भारताच्या निर्मितीसाठीची मजबूत पायाभरणी आहे. देशाला विकसित भारत, आर्थिक महासत्ता बनवण्याच्या प्रधानमंत्री मा.श्री. नरेंद्र मोदी साहेबांच्या प्रयत्नांना महाराष्ट्र संपूर्ण सहकार्य करेल. प्रधानमंत्र्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र संपूर्ण योगदान देईल, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे.

# विरोधामध्ये प्रचार करणारावर नाराजी दाखवू नका आ.मुटकुळे यांचे कार्यकर्त्याला आव्हान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



हिंगोली विधानसभेमध्ये अनेक राजकीय कार्यकर्ते विरोधामध्ये फिरत होते त्यांच्यावर नाराजी दाखवू नका असे हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी सेनगाव येथे भारतीय जनता पार्टी कार्यालय या ठिकाणी सदस्य नोंदणी कार्यक्रमात कार्यकर्त्यांना समजूत घातली, हिंगोली विधानसभेमध्ये अनेक कार्यकर्त्यांनी विरोधामध्ये प्रचार केला असून विरोधी कार्यकर्त्यावर भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी नाराजी दाखवूनही विजय माझा निश्चित होता मला विश्वास होता असे आमदार मुटकुळे यांनी सदस्य नोंदणी कार्यक्रमांमध्ये सदस्यांना द अधिकार्यांना सांगितले, लवकरच हिंगोली विधानसभेमध्ये विकासासाठी पाऊल उचलून अनेक योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्याचं काम कार्यकर्त्यांना करायचे असून विरोधी कार्यकर्त्यावर नाराज न होता आपल्याला हिंगोली मतदार संघामध्ये बरेच विकास कामे करायचे आहेत, असे हिंगोली विधानसभेतील आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी सदस्य नोंदणी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमांमध्ये अनेक पद अधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते, हिंगोली मतदार संघामधील प्रश्न पांदण रस्ते ,शेतकऱ्यांना विद्युत डीपी, रस्ते, स्मशानभूमी, सभा मंडप, अशा विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचवून आपल्याला हिंगोली मतदार संघाचा बराच काही विकास करायचा असून आपण सर्व मिळून हिंगोली मतदार संघाचा विकास करू असे आवाहन कार्यकर्त्यांना आमदार मुटकुळे यांनी दिली आहे.

# पानभोसी येथे मातृस्पर्श आई गौरव सोहळ्याचे आयोजन

## आई ललिताबाई घोडकेंचा होणार सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

उस्माननगर येथील बोल्हाई प्रतिष्ठान च्या वतीने दरवर्षी २ फेब्रुवारी रोजी दिला जाणारा मातृस्पर्श आई गौरव पुरस्कार यावर्षी पानभोसी ( ता. कंधार) येथील आई श्रीमती ललिताबाई बाबुराव घोडके यांना देवून गौरव करण्यात येणार आहे.



पानभोसी गावातील विविध क्षेत्रातील लोकांना एकत्रित करून गाव वनराई युक्त करण्यात या आईचे खूप मोठे योगदान आहे. गावाशेजारी असलेल्या टेकडीवर विविध प्रकारच्या रोपांची लागवड करून ती आज जगवलेली दिसत आहे. टेकडीवरील सिद्धेश्वर महादेव परिसर हिरवागार झालेला पहावयास मिळतो. निसर्ग सेवा मंडळ माध्यमातून आज वन पर्यटनासाठी आज येथे महाराष्ट्रातील अनेक ठिकाणांहून पर्यटक भेट देतात.

अशा अतिशय महत्वाच्या वनसंपदा उभारणारे हातांना मायेचा स्पर्श करून ओसाड माळ हिरवा करण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या आईचा यावर्षीच्या मातृस्पर्श आई गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे. रविवारी दि. २ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता पानभोसी येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर निसर्ग गड येथे बोल्हाई प्रतिष्ठान च्या अध्यक्ष सौ. नलिनीबाई विश्वासराव लोखंडे व आदर्श शिक्षक विश्वासराव विठ्ठलराव लोखंडे यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. या सोहळ्यास निसर्ग प्रेमी सह मित्र मंडळी, गावकरी यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन उस्माननगर पत्रकार संघाचे अध्यक्ष गणेश लोखंडे, उपाध्यक्ष माणिक भिसे, राजीव अंबेकर, देवीदास डांगे, लक्ष्मण भिसे,दिपक लोखंडे, संभाजी काळम, लक्ष्मण कांबळे, प्रदीप देशमुख, अतुल सुपेकर, प्रतिभा खोडवे, विठ्ठल ताटे पाटील, मिरा बोधनकर, आदींनी केले आहे.

# अंजनीच्या उपसरपंचपदी सुभाष गावंडे यांची बिनविरोध निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

मौ. अंजनी तालुका बिलोली जिल्हा नांदेड येथील दि. ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी अंजनी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सुभाष गावंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली अंजनीचे सरपंच महेश पाटील हांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित सभेत उपसरपंच पदासाठी एकमेव उमेदवारी अर्ज सुभाष बाबाराव गावंडे यांनी सादर केला. त्यामुळे ग्रामपंचायतचे सचिव तथा ग्रामसेवक अविनाश हाळदेवाड यांनी बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी सरपंच महेश पाटील हांडे, ग्रामसेवक अविनाश हाळदेवाड, ग्रामपंचायत सदस्य श्रीदेवी शिवाजी बावलगावे, मंजुषा सिध्दार्थ गावंडे, इराबाई रामचंद्र मुंडकर, निर्मलाबाई भुजंग पाटील हांडे , सागरबाई मारोती हांडे, शंकर पुंजरवाड, गणेश हांडे, मोहन मुंडकर,शिवराज पाटील हांडे, संभाजी कांबळे, नागोराव डुमणे, शंकर पाटील हांडे, वंचित बहुजन आघाडीचे बिलोली तालुका अध्यक्ष धम्मदीप गावंडे, माधव हांडे, मारोती हांडे, बालाजी मुंडकर, शिवाजी बावलगावे, नझिर शेख, सलिम शेख, विठ्ठल गावंडे, शंकर डोंगरे, विजय गावंडे, जयदीप गावंडे, नामदेव गावंडे, बालाजी गावंडे, अभिनंदन डुमणे आदी गावकरी उपस्थित होते.निवडीनंतर सुभाष बाबाराव गावंडे यांनी ग्रामविकासासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यांचे गावकरी आणि स्थानिक नेत्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# एक एकर शेतातील ऊस उपटुन नुकसान केलेल्या आरोपींवर गुन्हे दाखल!

## दैनिक लोकनेता पेपरचा इफेक्ट २४ तासांच्या आत आरोपींवर गुन्हे दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशन गायकवाड**


दैनिक लोकनेता Page 3 01 Feb 2025
Powered by - epaper.lokneta.in

**शेतातील दोन महिन्यांच्या ऊसाची कतीने कापुन पन्नास हजार रुपयांचे आर्थिक नुकसान**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशन गायकवाड**

उमरी किशनराव सटवाजी गायकवाड रा कुदळा ता उमरी जि नांदेड येथील शेत जामगाव हाधीतील गट क्रं १९७ क्षेत्र ०.४० हे. मध्ये लागन केलेला दोन महिन्यांचा ऊस दि ३०/०२/२५ रोजी कतीने कापुन अंदाजे पन्नास हजार रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहेत. दि ३१ जानेवारी रोजी सकाळी पोलिस निरीक्षक उमरी यांनी घटनास्थळी भेट दिली असून पुढील तपास बिट जमादार सिंधी गोविंद शिंदे यांच्या कडे दिलेला आहे.

मौजे कुदळा ता. उमरी जि. नांदेड येथील शेतकरी किशनराव सटवाजी गायकवाड यांच्या शेतात जामगाव शिवारातील गट क्रं. १९७ क्षेत्र ०.४० हे. मध्ये दि २०/११/२०२५ रोजी ऊसाची लागवड केलेल्या दोन महिन्यांच्या उसाचे पिक मुळा सकट उपटून पन्नास हजार रुपयांचे आर्थिक नुकसान केलेले आहे. सदरील घटना दि ३०/०१/२५ रोजी दुपारी ४ वाजता गावातील शेत शेजारी साहेबराव वामन भेरजे, संतोष वामन भेरजे (भाऊ) , गौत्तम वामन भेरजे (भाऊ), धमदिप वामन भेरजे (भाऊ) इत्यादी संगनमत करून मागील जुन्या भांडणाचा मनात राग धरून गायकवाड यांच्या शेतातील ऊस मुळा सकट उपटून पन्नास हजार रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहे. सदरील आरोपी विरोधात किशनराव गायकवाड कुदळेकर यांनी उमरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केल्यानंतर पोलिस निरीक्षक अंकुश माने यांनी सोबत पोलिसाचा फौज फाटा घेऊन दि. ३१/०१/२५ रोजी शेतात घटना स्थळीं भेट देऊन संबंधित वरील आरोपींवर दुपारी १५.१३ वाजता बि.एन.एस २०२३ नुसार कलम ३२४(४), ३२४(५),३५२,३५१(२),३५१(३)३(५) प्रमाणे इत्यादी गुन्हे दाखल करण्यात आले असून सिंधी बिट जमादार गोविंद शिंदे हे आरोपींचा शोध घेत आहेत. यामागे राजकीय षडयंत्र असुन गावातील सुवर्ण जातीच्या राजकीय पुढाऱ्यांचा हात असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरून गायकवाड यांचा दावा धरून अनेक वर्षांपासून यांना त्रास देण्यात येत असुन आज पर्यंत सोयाबीनचा ढग जाळणे, दोन एकर मधील ऊसाला आग लावून जाळणे, दलित समाजकंटकां मार्फत मुलगा व गायकवाड यांच्यावर प्राणघातक हल्ले करणे, शेतातील विहिरीच्या पाण्याची ५ एच पी मोटारची चोरी करणे, पाईप व वायरची चोरी करणे, शासन दरबारी व समाजात गायकवाडची बदनामी करून अपमानीत करणे इत्यादी प्रकारचा सामाजिक, मानसिक व आर्थिक छळ करीत असुन वरील लोकांपासून गायकवाड व गायकवाड यांच्या परिवाराच्या जीवीतास धोका असुन वरील सर्व प्रकरणात या आरोपींचाच हात आहे. त्यांची कसुन चौकशी करून त्यांचेवर कारवाई करावे व त्यांना अटक करावे. गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादी मध्ये अशी मागणी केलेली आहे.

# नमो सद्गुरु तुकया ज्ञानदीपा...!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

हे महामानवा, बा तुकारामा, आपल्या जन्माने महाराष्ट्राच्या समृद्ध विचारप्रवण क्षितिजावर आणखी एक तेजोमय विचारसुर्य उगवला! महाराष्ट्राच्या कणाकणाला प्रतिभेची दिव्यता मिळवून देणारा ज्ञानदीप उजळला! एकावर एक खडतर अनुभवांना सामोरे जातांना आपण स्वतः उजळत आपला भोवताल देदीप्यमान केलात. वारकरी संप्रदायातील आपल्या कृतीशील कार्याने क्रांतिकारी वारकरी संप्रदाय देहूतून इथल्या सामन्यांच्या देहात पुरेपूर उतरला! माणूस माणूस कृतकृत्य झाला. उणेपुरे ४२ वर्षे लाभलेले कार्यशीळ, भजनशीळ आयुष्य! आपले जगणे वर्तमानाला हलवून आणि भविष्यकाळ सुगंधित करून गेले! आयुष्याचे सोने होणे म्हणजे काय? म्हणजेच तुकाराम! यावच्चंद्रदिवाकरौ म्हणजेच तुकाराम!

नमो सद्गुरु तुकया ज्ञानदीपा।नमो सद्गुरु सच्चिदानंद रूपा।।

नमो सद्गुरु भक्तकल्याणमूर्ति।नमो सद्गुरु भास्करा पूर्ण कीर्ती।।

निळोबाराय महाराजांनी तुकोबांना केलेले हे नमन सार्थ आणि आर्त वाटते.स्वतःच्या जगण्याच्या कवितेने लोकांचे जगणे सोपे करणारा हा वेडा कवी, कधी अनंत जन्म-मरणाच्या कविता लिहून गेला(?) ते त्यालाही कळले नाही! एखाद्या कवीच्या कविता विकून आणि त्या गावून अनेकांनी आपले इमले उभे केले, गाड्या-घोड्या घेतल्या! एवढेच काय? केवळ तुकोबांमुळेच अनेकांची लग्ने सुद्धा जुळली! केवढा पुण्यवान तू बापा! किती किती अनमोल शब्दबीज पेरून ठेवलेस! आज आपला जन्मदिवस! इकडे मिडीयावर सगळी वाढदिवसाची धावपळ सुरु असतांना आपल्यावरही दोन शब्द लिहून मनोमन कृतज्ञता व्यक्त करावी त्यासाठी हा शब्द प्रपंच!.माय-बाप वाचकहो, जगद्गुरू संत तुकारामांना जन्मून आणि आपल्यातून जावून तब्बल पावणे चारशे वर्षे संपत आहेत. त्यांच्या लेखणी आणि चरित्राचा इथल्या समाजमनावर प्रभाव दिवसेंदिवस वाढतच आहे. तुकाराम हा लोककवी म्हणून सर्वच धर्मीय, समाजसुधारक, विचारवंत यांना सर्वकाळ आवडलेला आहे. विशेषतः भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मूकनायक वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर तुकोबांचे अभंग लिहून तुकोबांच्या सार्वकालिक लेखणीची कीर्ती वाढविली आहे. भक्ती, प्रेम, जिव्हाळा, प्रतिभा, अभंग, भजन, कीर्तन, सामाजिक सलोखा, स्त्री-पुरुष समानता यासाठी कृतीशील कार्य केले. तुकोबांनी आपला आचार-विचार प्रसारित करतांना

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।भेदाभेदभ्रम अमंगळ ।।१।।

तुका म्हणे एका देहाचे अवयव ।सुख दुःख जीव भोग पावे ।।३।।

असे रोखठोक अभंग लिहून जातभेद-वर्णभेद याला तिलांजली देण्याचे महत्कार्य आपल्या लेखणीतून केले. सर्वत्र ईश्वर अस्तित्व असून केवळ सत्य हाच देव आहे. कुणाचाही द्वेष, मत्सर न करणे हीच खरी पूजा. अत्यंत म्हत्वाचे म्हणजे आपण सगळे एका देहाच्या अवयवांप्रमाणे एकच असून कोणताही अवयव दुखला तरी वेदना सर्व शरीराला होतात; असे सरळ, सोपे, भेदरहित जगण्याचे जीवनतत्व तुकोबांनी मांडले. खरा वारकरी किंवा भक्त कोण? या प्रश्नांची उत्तरे या अभंगात देतांना कोणती जात श्रेष्ठ, कोणती कनिष्ठ? याचा उल्लेख करतांना

निवडी वेगळे क्षीर आणि पाणी।राजहंस दोन्ही वेगळाली।।३।।

तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे।येरा गाबाळाचे काम नाही।।४।।

असे लिहून वारकरी महाराष्ट्राला तुकोबा सजग करत राहतात. कुणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसून आपल्याला सृष्टीने सर्व गोष्टी समान दिल्या आहेत.



जन्मतांना माणसांत कोणताही भेद नसेल तर मग एखादा श्रेष्ठ आणि एखादा कनिष्ठ कसा? आपण सर्व जर एकाच आईची लेकरे असू; तर आपल्यात लहान मोठेपण कसे येईल बरं? इथे जात म्हणजे केवळ माणूस! ज्याप्रमाणे राजहंस पाणी आणि दुध वेगळे कतो त्याप्रमाणे खरा माणूस योग्य-अयोग्य, खरे-खोटे सहज वेगळे करतो, जो केवळ सत्याच्या बाजूने बोलतो तोच खरा माणूस, मग त्याच्या जात-धर्म-पंथ-लिंग इत्यादीचा काहीही संबंध असता कामा नये. याच अनुषंगाने समकालीन कवी संतोष नारायणकर लिहितांना आपल्या दोन पाय दोन हात या कवितेत

अशीच एकदा त्यांनी माझी विचारली होती जात
मी म्हणालो काय सांगू? दोन पाय दोन हात
आपल्या सर्वांची विविधतेत एकता सर्वश्रुत करतात.

तुकोबांनी मानवी जगण्याचे मूलगामी तत्वज्ञान मांडतांना इथल्या वर्णभेद करणाऱ्या माणसांना सुद्धा जीव लावला. रामेश्वर भटाच्या अंगाचा दाह होत असतांना तुकोबांनी त्यांना भेटून त्यांचा दाह थांबविला, मंबाजी भटाने मारले तरीही तुकोबा त्यांच्या कीर्तनाला जाऊन उभे राहिले. जीवनाचे तत्वज्ञान बोलतांना तसे वर्तन करून दाखवले. संत ज्ञानदेवांच्या पसायदानातील जे खळांची व्यंकटी सांडो उक्तीप्रमाणे खळ न संपवता खळांचा वाकडेपणा, दोष जाण्याची प्रतिज्ञा ज्ञानोबा करतात, त्याच मार्गाने कृतीशील तुकोबा चालत राहतात.सज्जनहो, आज आपली जबाबदारी वाढली आहे. जगात भारताची संसदीय लोकशाही आपला ठसा उमटवतांना आपल्या राज्यघटनेने आपल्या मुलभूत हक्क, कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. इथे सर्वांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. आपण आपला विचार निर्भीडपणे मांडू शकतो. कोणतीही असंवैधानिक भाषा अथवा कृती न करता आपण भारतीय संविधानाने दिलेल्या हक्क आणि अधिकारांचा विनियोग करू शकतो. त्यासाठी आपण सर्वांनीच आपल्या पूर्वज महापुरुषांच्या योगदानाचा, मार्गांचा अवलंब करून हा देश प्रगतीपथावर घेऊन जावा लागणार आहे. त्यासाठी मिडियावरील प्रतिक्रिया दुर्लक्षित करून आपण सजग रहावे लागेल. कुणाच्याही चुकीच्या गोष्टींचे समर्थन होता कामा नये, तसेच कुणी हुकुमशाही वृत्ती सुद्धा जोपासता कामा नये. अशी वृत्ती जोपाल्यास समाजमन अस्वस्थ होईल. स्वातंत्र्य धोक्यात येईल. सामान्य माणसाला असुरक्षित वाटायला लागेल. त्यासाठी महामानवांच्या जयंती-पुण्यतिथीला त्यांच्या वैश्विक विचारांची पेरणी सातत्याने करावीच लागेल. माय-बापहो, आपणाला जगद्गुरू तुकारामांच्या अभंगांची जाणीवपूर्वक दखल घ्यावी लागेल. तुकोबांचा गाथा आपल्यासारख्या संसारीकांसाठी एक अनमोल ठेवा आहे. तुकोबा हे सर्वकाळ पथदर्शी, अलौकिक प्रतिभावंत, लोककवी आपल्या अभंगातून जीवनाला नवनवे आयाम देतात. साडेचार हजाराच्यावर असणारे अभंग आपल्याला वर्तमान परिपेक्षात सजग करतात, सहजतेने जागवून जातात. काळाच्या छातीवर पाय रोवून प्रबोधन करणारे तुकोबाराय आपल्या सर्वांनाच खुणावत असतात. अलीकडे मोबाईल आणि मिडिया संस्कृतीत हरवलेला समाज आणि तरुण जास्तीत जास्त वेळ हातात मोबाईल घेऊन बसलेला असतांना काही वेळासाठी आपण मोबाईल बाजूला ठेवून हातात पुस्तक घ्यावे, तुकोबांचा गाथा घ्यावा. मित्रहो, वाचनाने माणूस समृद्ध होतो. आज वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याची वेळ आली आहे. येणारा काळ आपण मनाने आणि शरीराने मजबूत करून वर्तमानाच्या समोरील खडतर आव्हाने लीलया झेलण्याची क्षमता आपल्यात आणावी लागेल. त्यासाठी आपण क्षणिक किंवा जवळचे न पाहता थोडे मागे पहावे आणि थोडे दूर पहावे. सहजच आपली नजर दृष्टी होऊन ती दूरदृष्टी व्हावी, आणि ते शक्य आहे. त्यासाठी आपण सातत्याने लेखन-वाचनाला आणि त्या अनुषंगाने चिंतनाला बांधून घ्यावे लागेल. महापुरुषांचा हा अनमोल खजाना पुढे न्यावाच लागेल. तेंव्हा चला मित्रहो, तात्कालिक राजकारण बाजूला ठेऊन आज तुकोबांच्या जयंतीदिनी समतेचा, एकोप्याचा धडा घेतांना माणसामाणसातील भेद समूळ संपवतांना केवळ मानवतावादी विचार टिकावा यासाठी प्रयत्न करूया. असे झाल्यास महाराष्ट्राला तुकोबांची जयंती मोठ्या आनंदाने साजरी करण्याचे समाधान लाभल्याशिवाय राहणार नाही. जय तुकोबाराय!

**-प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये**
**कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय,सोनपेठ**
**जि. परभणी (महाराष्ट्र)**
**मो.९१५८०६४०६८**

## श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात मातृ पितृ पूजन सोहळा संपन्न



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**गेवराई । प्रतिनिधी**

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत शनिवारी दि.१ रोजी सकाळी मातृ पितृ पूजन सोहळा कार्यक्रम संपन्न.

या कार्यक्रमाचे सुरूवात माता सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच रामेश्वर जगताप, गडाम सर, गिरी बाबा, शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले आदींची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांचे पुष्पहार अर्पण करून पुजन केले. तर मुलांनी वृध्दापकाळात सांभाळ करण्याचा संकल्प केला. यावेळी बोलताना सरपंच रामेश्वर जगताप म्हणाले की, या कलियुगात मुलगा आई बापाला विचार नाही. त्यामुळे दिवसेंदिवस वृध्दाश्रम वाढत आहे. परंतु आज श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत जो मातृ पितृ पूजन सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे मुलांना या माध्यमातून आपल्या आई वडिलांचे महत्व समजावून घेता आले. प्रयाग या ठिकाणी जसा महाकुंभ मेळा आयोजन होत आहे. त्यांची एक अनुभूती या ठिकाणी आली असल्याचे सांगून शाळेमध्ये राबविण्यात येणार विविध कार्यक्रम हे विद्यार्थ्यांना एक प्रकारे जगण्याच्या व पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देणाऱ्या असतात. त्यातील हा एक मातृ पितृ पूजन सोहळा आहे. यामुळे विद्यार्थी देशेतच बालकांमध्ये चांगले संस्कार रुजविण्याचे काम व आपल्या आई वडिलांना विषयी आदर निर्माण करण्याचा हा एक स्तुत्य उपक्रम आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांनी केले. प्रस्ताविकपर भाषणात त्यांनी आपल्या जीवनात आई वडिलांचे किती महत्त्व असते हे सांगितले. पालकामधून राम पडुळे, मोहन वक्ते व गणेश मुगूटराव यांनी या कार्यक्रमाबद्दल आपले मत व्यक्त करुन विद्यार्थी मध्ये संस्कार रुजविण्यारे असे कार्यक्रम नक्कीच वारंवार शाळेने घ्यावा असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुक्ताबाई मोटे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, भागवत सोळूंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, मयुर येवलेकर, नवनाथ घुगे, हरीभाऊ आघाव, वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे यांनी सहकार्य केले.

## पंतप्रधान घरकुल आवास योजना,मंजूर लाभार्थ्यांनी दोन दिवसात कागदपत्राची पूर्तता करावी-गटविकास अधिकारी,सचिन सानप

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना-ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत..लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत.

गावनिहाय ग्रामपंचायत कार्यालया समोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे येत्या दोन दिवसांत आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा..आणि मार्च अखेपर्यंत घराचे बांधकाम पूर्ण करावे असे आवाहन आष्टी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ.सचिन सानप यांनी केले आहे याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की,आ.सुरेश धस अण्णा यांनी प्रयत्नपूर्वक आष्टी तालुक्यामध्ये अनेक गावातील लाभार्थ्यांसाठी पंतप्रधान घरकुल योजना-ग्रामीण टप्पा -२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता वितरणाचे काम हाती घेतले आहे..प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी तालुक्यात ६१५७ घरकुले मंजूर झाले असून यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी १) ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा, २) आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे येत्या दोन दिवसात करावी. पुढच्या आठवड्या पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पहिल्या हप्त्याचे अनुदान जमा केले जाणार आहे. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे दोन दिवसात जमा करावेत म्हणजे ऑनलाइन प्रणाली मार्फत घरकुल मंजुरी व लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा पहिला हप्ता जमा होणार असून या घरकुलांचे बांधकाम मार्च २०२५ अखेर पूर्ण करावे याबाबत माननीय आमदार सुरेश धस अण्णा यांनी याबाबत बैठकीमध्ये निर्देश दिलेले आहेत त्यानुसार सर्व लाभार्थ्यांनी दोन दिवसात कागदपत्र जमा करून पहिला हप्ता पदरात पडून घ्यावा आणि बांधकाम सुरू करून उर्वरित अनुदान प्राप्त करून घ्यावे आणि ३१ मार्च २० २५ पूर्वी घरकुलाची बांधकाम पूर्ण करण्यात यावे असे आवाहन ही गट विकास अधिकारी डॉ.सचिन सानप यांनी केले आहे.



## भोकर येथे विश्वकर्मा जयंती निमित्त श्रीमद् भागवत कथेचे आयोजन-भाविकांना लाभ घेण्याचे आवाहन


**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**भोकर । रमाकांत जोशी**

भोकर येथे विराट प्रभु विश्वकर्मा जयंतीनिमित्त भोकर येथे दि. ३ ते १० फेब्रुवारी दरम्यान श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून कथा प्रवक्ते ह.भ.प.भागवताचार्य गजानन महाराज जुनगडे पैठण यांच्या सुमधुर रसाळ वाणीतून ही कथा ऐकावयास मिळणार आहे.

भोकर येथील म्हैसारोड लगत बांधण्यात आलेल्या विश्वकर्मा मंदिर कलशारोहण चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजित करण्यात आला असून सकाळी ४ ते ६ काकडा भजन, दुपारी १ ते ४ श्रीमद् भागवत कथा,सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ,रात्री ८ ते ११ हरी कीर्तन होणार असून श्रीमद् भागवत कथेचे प्रवक्ते भागवताचार्य

ह.भ.प.गजानन महाराज जुनगडे हे राहणार आहेत.रात्री कीर्तनाचे कार्यक्रम पुढील प्रमाणे दि.३ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. स्वातीताई तुपेकर, ४ फेब्रुवारी रोजी ह. भ. प. प्रतीक्षा दीदी आळंदीकर, ५ फेब्रुवारी रोजी ह भ प भुजंग महाराज रोडगीकर, ६ फेब्रुवारी रोजी ह. भ. प. महाजन महाराज दगडवाडीकर, ७ फेब्रुवारी रोजी ह. भ. प. महंत प्रभाकर बाबा कपाटे भोकर, ८ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. तुकाराम महाराज नांदेड,९ फेब्रुवारी रोजी ह.भ.प सुधाकर महाराज खैरगावकर यांचे कीर्तन होणार असून दिनांक १० फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत समारोपीय काल्याचे किर्तन ह.भ.प.गजानन महाराज जुनगडे यांचे होणार आहे.दुपारी १२ वाजता श्री विश्वकर्मा प्रभूचा जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे.तरी या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी आवर्जून लाभ घ्यावा असे आवाहन विश्वकर्मा मंदिर समिती, युवा मंडळ, महिला मंडळ तालुका भोकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## प्राप्तिकर कराच्या बाबतीत नोकरदारांना,करदात्यांना, सर्वसामान्य व शेतकऱ्यांना सुद्धा दिलासा देणारा अर्थसंकल्प-आमदार विक्रम पाचपुते

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

अर्थमंत्री निर्मला जी सिताराम यांनी सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय करदात्यांच्या अपेक्षेप्रमाणे फार मोठी सवलत प्राप्तिकरामध्ये या अर्थसंकल्पामध्ये दिलेली आहे. नोकरदारांच्या बाबतीत त्यांच्या स्टॅंडर्ड डिडक्शन मध्ये ५०००० पासून ७५ पर्यंत पर्यंत वाढ केल्यामुळे त्यांना १२ लाखापर्यंत उत्पन्न असेल तर टॅक्स लागणार नाही.मात्र इतर करदात्यांच्या बाबतीत चार लाखापर्यंत उत्पन्न करमुक्त आहे ४ लाखाच्या पुढे ८ लाखापर्यंत पाच टक्के टॅक्स, ८ लाख ते १२ लाख,- दहा टक्के टॅक्स, १२ लाख ते १६ लाख-- पंधरा टक्के टॅक्स, १६ लाख ते २० लाख- वीस टक्के टॅक्स ,२० लाख ते २४ लाख- पंचवीस टक्के टॅक्स आणि २४ लाखाच्या पुढे तीस टक्के टॅक्स अशा पद्धतीने कररचनेमध्ये आणि कराच्या दरामध्ये फार मोठे बदल करण्यात आले असून त्याचा फायदा निश्चितपणे प्राप्तिकर करदात्यांना मोठ्या प्रमाणावर होणार आहे. हा फायदा सर्वच करदात्यांना कमी अधिक प्रमाणात होणार आहे .पन्नास हजारापासून करकपातीची मर्यादा ज्येष्ठ नागरिकांना एक लाखापर्यंत वाढवण्यात आलेली आहे .करकपातीसाठी घरभाड्याची मर्यादा सुद्धा वाढवण्यात आलेली आहे आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ज्यांनी रिटर्न्स भरलेली नाहीत ते आता चार वर्षांपर्यंत त्यांची प्राप्तिकर विवरणपत्र



भरू शकणार आहेत. यामध्ये प्राप्तिकर खात्याच्या कराच्या रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे. तसेच विवरण पत्र न भरणाऱ्या करदात्यांची सुद्धा सोय होणार आहे .दंडापेक्षा करदात्यांना न्याय देण्यावर भर असल्याचा संकल्प अर्थमंत्र्यांनी बोलून दाखवला आहे .२०४७ पर्यंत नवीन अनुशक्ती धोरणानुसार १०० गिगा वॅट चे लक्ष ठेवलेले आहे. २०२५ मध्ये चाळीस हजार नागरिकांना घर देण्याचा संकल्प आहे .अनेक वस्तू त्यामध्ये एलईडी ,एलसीडी वैद्यकीय उपकरणे, टीव्हीचे पार्ट, इलेक्ट्रिक कार, मोबाईल संच स्वस्त होणार आहेत आणि त्यामुळे सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय नागरिकांना निश्चितपणे दिलासा मिळणार आहे.अर्थमंत्र्यांनी प्राप्तिकर विषयीचे नवीन विधेयक पुढच्या आठवड्यात सादर करणार आहे असे आश्वासन दिले आहे.शेतकऱ्यांना सुद्धा काही अनेक सवलती देण्यात येणार आहेत.किसान क्रेडिट कार्डची मर्यादा पाच लाखापर्यंत वाढवणे, पाच लाखांपर्यंत कर्ज मर्यादा वाढवणे,शंभर जिल्ह्यामध्ये कृषिधन धान्य योजना लागू करणे ,सूक्ष्म उद्योगांना कर्ज देणे, मागासवर्गीय महिलांना मदत करणे ,अशा अनेक तरतुदी अहवालात केलेल्या आहेत. मेडिकल कॉलेजमधल्या जागा ७५ हजार पर्यंत वाढवणार आहेत आणि विशेषतः मध्यमवर्गाची क्रयशक्ती वाढवण्यासाठी कर रचनेमधील बदल निश्चितपणे उपयोगी ठरणार आहेत. एकंदरीत सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय नागरिकांना, करदात्यांना आणि शेतकऱ्यांना सुध्दा या बजेटमुळे दिलासा मिळणार आहे अशी माहिती आमदार पाचपुते यांनी दिली.

# प्रेमसंबंधाच्या कारणावरुन दोन मुलांवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला

## इंदापूरच्या भवानीनगर मध्ये घडली धक्कादायक घटना

लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

कॉलेज मधील प्रेमसंबंधाच्या कारणावरुन दोन मुलांवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आलाय.इंदापूर तालुक्यातील भवानीनगर गावात भवानी माता मंदिराच्या परिसरात ही धक्कादायक घटना घडली आहे.संचित घोळवे आणि सुजल जाधव अशी जखमींची नावे आहेत.यापैकी सुजल जाधव याच्या डोक्यामध्ये जबर वार बसल्याने तो गंभीर जखमी झाला आहे.

घटना घडल्यापासून केवळ दोन तासातच वालचंदनगर पोलिसांनी या घटनेतील आरोपींना ताब्यात घेतलय.अदनान महंमद शेख,पियुष प्रथम चव्हाण आणि यशराज गणेश अरवडे यांना ताब्यात घेण्यात आले असून हे तिघेही इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील आहेत.यांसोबत या गुन्ह्यात इतर दोन विधी संघर्ष ग्रस्त बालकांचाही समावेश आहे. वालचंदनगर पोलिसांनी या आरोपींची भवानी नगर मधील ज्या बाजारपेठेत हा हल्ला केला त्याच बाजारपेठेतून त्यांची धिंड देखील काढली आहे.

हल्ला करणारी मुले ही बारामती वरुन पुणेच्या दिशेने जात असल्याची माहिती प्राप्त होताच पोलिसांनी त्यांचा सिने स्टाईलने पाठलाग करुन त्यांना सुपा पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस स्टाफ व स्थानिक गावकरी यांच्या मदतीने ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार भवानीनगर येथील संचित बाळासो घोळवे,सुजल संतोष जाधव व त्यांचे इतर मित्र हे भवानीनगर येथील भवानी माता मंदीर मध्ये बसलेले असताना अदनान शेख, पियुष चव्हाण,यश अरवडे व इतर दोन विधी संघर्ष ग्रस्त बालकांनी सुजल जाधव व संचित घोळवे यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करत अदनान शेख व अन्य एकाने त्यांच्याकडील लोखंडी कोयत्याने



संचित घोळवे,सुजल जाधव यांच्यावर कोयत्याने वार केले.मारहाण करणाऱ्या विधी संघर्ष ग्रस्त बालकाच्या नात्यातील मुलीसोबत संचित घोळवे याचे प्रेम संबंध होते त्याच कारणावरुन संचित घोळवे याचा दिनांक ३० जानेवारी रोजी वाद झाला होता. परंतु तो वाद दोघांनी आपआपसात मिटवुन घेतला होता. त्यानंतर शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी रोजी संचित बाळासो घोळवे, सुजल संतोष जाधव व त्यांचे इतर मित्र भवानीनगर येथील मंदीर मध्ये बसलेले असताना तु माझ्या मामाच्या मुलीसोबत प्रेम संबंध ठेवतो काय आता तुला सोडत नाही असे म्हणत त्यांना मारहाण करण्यास सुरवात केली. अदनान शेख व अन्य एकाने त्याच्याकडील लोखंडी कोयत्याने संचित घोळवे व सुजल जाधव यांच्यावर वार केले.त्यामध्ये सुजल जाधव याच्या डोक्यामध्ये जबर वार बसल्याने तो गंभीर जखमी झाला आहे.

सदरची कामगिरी ही पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख,अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार,उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.सुर्दशन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे,पोलीस उप–निरीक्षक विजय टेळकीकर,पोलीस हवालदार गुलाबराव पाटील,पोलीस हवालदार बापु मोहिते,पोलीस हवालदार शैलेश स्वामी,पोलीस हवालदार गणेश काटकर,पोलीस हवालदार अजित थोरात,पोलीस हवालदार नानासाहेब आटोळे,पोलीस हवालदार सचिन गायकवाड, पोलीस अभिजीत कळसकर,पोलीस अंमलदार विक्रमसिंह जाधव यांनी केली आहे.

# जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली आर्या नैसर्गिक शेतीला भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आर्या नैसर्गिक शेती यांच्या संयुक्त विद्यमानाने विविध कृषी विषयक योजनेचा शुभारंभ व पीक पाहणी कार्यक्रम विश्वनाथ गोविंदराव होळगे दापशेड ता. लोहा.जि.नांदेड यांच्या आर्या नैसर्गिक शेतीमध्ये पार पडला. यावेळी जिल्हाधिकारी राऊत यांनी रात्री सात पर्यंत आर्या नैसर्गिक शेती मध्ये रमले. जिल्हाधिकारी यांचे आर्या नैसर्गिक शेतीमध्ये आगमन झाल्या नंतर सुरुवातीला त्यांचं विश्वनाथ गोविंदराव होळगे यांच्या कुटुंबातर्फे जिल्हाअधिकारी यांचे औक्षन करण्यात आले. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी यांनी आर्या नैसर्गिक शेतीच्या सर्व पिकाची पाहणी केली नंतर जीवामृत घनामृत दशपर्णी अर्क विविध प्रकारचे टॉनिक कशी बनवतात हे सर्व विश्वनाथ होळगे यांच्या मार्फत निरिक्षण



केले. सर्व आलेले पाहुणे चिंचेच्या झाडाखाली स्थानापन्न झाली .आर्या नैसर्गिक शेतीच्या कुटुंबाच्या वतीने जिल्हाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आर्या नैसर्गिक शेतकरी गट दापशेड यांच्यामार्फत जिल्हाधिकारी साहेबांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक करताना विश्वनाथ होळगे यांनी आर्या नैसर्गिक शेती मधील गेल्या दहा वर्षापासूनचे अनुभव थोडक्यात व्यक्त केले. जिल्हाधिकारी साहेब यांनी सखोल असं मार्गदर्शन केलं. विश्वनाथ होळगे यांच्या शेतीला गेले अनेक दिवस झाले भेट द्यायची इच्छा होती व आज तो योग आला. आर्या नैसर्गिक शेतीचे कार्य जिल्हा राज्य तथा देशपातळीवर गेले आहे. नैसर्गिकरित्या पिकवलेले अन्न सेवन करणे खूप महत्त्वाचा आहे व अशा शेतीच्या माध्यमातून हे ध्येय साध्य होताना दिसत आहे. विश्वनाथ होळगे यांच्या कार्याबद्दल खूप ऐकलं आहे मी इतर शेतकऱ्यांना प्रत्येक कार्यक्रमाच्या ठिकाणी यांचे उदाहरण देत असतो. विश्वनाथ होळगे यांच्या पाठीशी सदैव प्रशासन राहील . मला या ठिकाणी येऊन खूप आनंद झाला असे मत अभिजीत राऊत जिल्हाधिकारी नांदेड यांनी व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाला यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक भाऊसाहेब बर्हाटे , सौ. अर्चना गुंजकर मॅडम प्रकल्प उपसंचालक आत्मा नांदेड ,डॉ.देविकांत देशमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी, मा. श्री विठ्ठल परळीकर तहसीलदार लोहा, सदानंद पोटपेलवार तालुका कृषी अधिकारी लोहा. आत्मा विभाग मा.सोहेल सयद श्री.गोविंदराव होळगे(मा.पोलीस पाटील दापशेड )मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, अनेक अधिकारी वर्ग ,आर्या नैसर्गिक शेतकरी गट, पंचक्रोशीतील शेतकरी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक एस .जी.होळगे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन विश्वनाथ गोविंदराव होळगे यांनी मानले,

# किशोर माध्यमिक विद्यालयात आनंद नगरी मेळावा संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील अटकळी येथील किशोर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आनंद नगरी मेळावा आयोजित करण्यात आला होता त्या अनुषंगाने दि.१ फेब्रुवारी रोजी ठिक सकाळी १० वाजता या उपक्रमाअंतर्गत अटकळी गावचे सरपंच प्रतीनीधी उत्तम बत्तलवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले.आनंद नगरी मेळावामध्ये १६ स्टॉल लावण्यात आले पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना कमवा व शिका याची जाणीव होण्यासह विविध व्यवसाय व व्यवहाराची माहिती व्हावी, यासाठी त्यात विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात विविध खाद्य पदार्थ व वस्तूंचे स्टॉल लावले यात पाणीपुरी,भेळ, गुलाब जामुन,अप्पे कचोरी,पोहा, खिचडी,पापड, वडापाव, चॉकलेट ,बिस्कीट,आदी.खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते, स्वादिष्ट खाण्यासाठी तयार केलेले गावातील प्रमुख मान्यवर यांनी विद्यार्थ्यांनाकडुन बनवलेले पदार्थांचे स्वाद घेतला. यावेळी गावातील ग्रामविकास पॅनलचे प्रमुख शिवाजी डोंगरे माजी चेअरमन भगवानराव जाधव,गुंणवत जाधव,शेख आयुब,बालाजी जाधव, मुख्याध्यापक श्री आर.व्ही.अटकळे,गव्हाने, पेंन्टे,विभुते,कचवे,मोरे,बैस,मोरे,कनशेट्टे सिध्देश्वर उपल्लवार, सर्व कर्मचारी वर्ग शिक्षकवृंद विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# जीवन मांजरमकर यांना ग्रंथालय चळवळ पुरस्काराने सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील मौजे मांजरम येथील जीवन वाघमारे यांनी गेल्या अनेक वर्षापासून ग्रंथालय चळवळ अतिशय जिद्दीने चालवली याची दखल घेऊन त्यांना नुकताच ग्रंथालय चळवळ पुरस्काराने सन्मानित खासदार अशोकराव चव्हाण व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले.

दि.२७ जाणेवारी २०२५रोजी मुदखेड येथे संपन्न झालेल्या सप्तरंगी सेवाभावी संस्था संचलित, सप्तरंगी साहित्य मंठळाचे चौथे जनसंवाद साहित्य संमेलनात जीवन मांजरमकर यांना ग्रंथालय चळवळ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.त्यांच्या सातत्य पुर्ण आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने त्यांनी ग्रंथालयाच्या माध्यमातून विविध उपक्रम



राबविल्यामुळे त्यांच्या साहित्याची दखल घेऊन हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.या संमेलनाचे उद्घाटक म्हणून माजी मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक डॉ जगदीश कदम कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष प्रवीण गायकवाड आणि ईतर मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांच्या आप्तजनासह सर्व मित्र परिवारांनी जीवन वाघमारे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिली.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात फूड फेस्टिवल, पुष्प रचना सजावट,फनी गेम्स, संगीत खुर्ची या उपक्रमांना उदंड प्रतिसाद

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

रयत शिक्षण संस्थेचे महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या निमित्ताने फूड फेस्टिवल, पुष्परचना सजावट, फनी गेम्स, संगीत खुर्ची इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच मिस मॅच डे साजरा करण्यात आला. या उपक्रमांना उदंड असा प्रतिसाद लाभला. या समारंभाचे उद्घाटन महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महावीर पटवा यांच्या हस्ते करण्यात आले. ते म्हणाले की, महाविद्यालयीन युवक युवतींनी उद्याच्या उद्योग व्यवसायाच्या वाटा अशा उपक्रमातून शोधाव्यात आणि आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करावे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महादेव जरे






होते. विद्यार्थ्यांच्या कलात्मक व व्यावसायिक उर्मिंना जागृत करण्यासाठी असे उपक्रम उपयोगी ठरतात. त्याचा आनंद घ्या. असे ते म्हणाले.

याप्रसंगी फूड फेस्टिवलचे समन्वयक, वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. रावसाहेब काळे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. पुष्परचना सजावटीचे समन्वयक म्हणून डॉ. हरिभाऊ वाघिरे यांनी काम पाहिले. फनी गेम्सचे समन्वयक म्हणून शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. कल्पना बागुल, क्रीडा शिक्षक प्रा. संजय डफळ यांनी काम पाहिले. या समारंभाला उदंड प्रतिसाद लाभला उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य शहाजी मखरे, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे,डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, कार्याध्यक्ष डॉ. बापू देवकर, प्रा. सौ. सुनिता सोनावळे, श्री रघुनाथ लबडे , सांस्कृतिक विभागाचे डॉ. राजाराम कानडे, प्रा. रमेश थोरात,एन.सी.सी. विभागाचे प्रमुख डॉ. किरण ढवळे, एन.एस.एस.चे प्रमुख प्रा. भाऊसाहेब बुलाखे, प्रा. देवेंद्र बहिरम, डॉ. राहुल गायकवाड, अधीक्षक बाळासाहेब राऊत तसेच या समारंभाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. राम ढगे यांनी केले.

# पालकमंत्री अतुल सावे यांची सर कोणाला येईल का ?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**माधव बैलकवाड । नायगाव**

शहरी भागासह ग्रामीण भागातील वळसणीला पडलेल्या सामान्य कार्यकर्ता पासून ते नेत्यापर्यंत आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यापासून ते जिल्हाधिकारी यांच्या पर्यंत सामान्य माणसाच्या अडीअडचणीसाठी फोन लावला असता तर अनेक दिवसापासून त्यांना प्रतीक्षा करावी लागते, एकाचे एकात पाय अडकल्याने सामान्य जनतेची बेहाल होताना तालुक्यासह जिल्ह्याची परिस्थिती पहाव्यास मिळते राज्याच्या २०२४ च्या मंत्रिमंडळात नांदेड जिल्हा साठी पालकमंत्री कोण येईल किंवा जिल्ह्यातीलच आमदार होईल का या आशेच्या किरणाने जिल्ह्यातील जनता चाय पे चाय चर्चा करीत असताना ऐकावयास मिळाली होती. परंतु ट्रिपल इंजन च्या सरकारने एक शांत संयमी व दूरदृष्टी जनसामान्याची नाळ असलेल्या सर्वसामान्य च्या हृदयातील प्रत्येक बाबीची जाण ठेवणारे कार्यकर्ता ते नेता म्हणून अनेक दिवसापासून नावारूपाला आलेलं नाव म्हणजे जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांची सर कोणाला येईल का ?

हा वृत्तांत लिहिण्यामागचे कारण म्हणजे नव्याने नांदेड जिल्ह्याला मिळालेले पालकमंत्री अतुल सावे हे सर्व सामान्य व्यक्तिमत्व तालुक्यातील कार्यकर्त्यांचे फोन उचलून त्यांच्या विविध अडचणीच्या समस्या विषयी जाणून घेऊन न्याय देण्याच्या भूमिकेतून दूरध्वनी वरून बोलताना समजते सरकार हे ट्रिपल इंजनचे असली तरी खरंच नांदेड जिल्ह्याला पालकमंत्री सावे यांनी सर्वसामान्य कार्यकर्ता ते नागरिकांना खरंच आगामी काळात न्याय देतील का तालुक्यासह जिल्ह्यातील सामान्य जनता अशाने पाहते. पालकमंत्री सावेच्या तोडीस तोड नायगाव तालुक्यातील भूमिपुत्र स्वर्गीय खासदार वसंतराव चव्हाण यांच्याही विचारात वरील बाबी प्रामुख्याने आढळून येतात स्वतःच्या पक्षातील कार्यकर्ता असो किंवा विरोधी पक्षातील कार्यकर्ता यदा कदाचीत अडचणीत सापडला असता कार्यकर्त्यांसह विरोधी कार्यकर्त्यांना स्वर्गीय वसंतरावजीना दूरध्वनी केली असता एकेरी भाषेचा वापर न करता सन्मानपूर्वक हसतमुखाने बोला काय अडचण, कसली अडचण असे म्हणत त्या अडचणीवर ते मात करण्यासाठी तात्काळ लाव रे फोन म्हणून समाधान करणारा या मातीतील भूमिपुत्र स्वर्गीय वसंतराव चव्हाण यांच्या विचाराशी जिल्ह्याचे पालकमंत्री असावे यांनी पक्षातील कार्यकर्त्यांसह विरोधी पक्षातील कार्यकर्त्यांना न्याय पालकमंत्री सावे हे देतील असे सध्या तरी म्हणता येईल. नांदेड जिल्ह्याला अनेक दिग्गज नेते लाभले पालकमंत्री झाले आणि पुढे होतील ही परंतु गेल्या काही दिवसापूर्वी जिल्ह्याचे मिळालेले पालकमंत्री नामदार सावे यांच्याशी चर्चा करताना सावे यांची सर कोणाला येईल का ?असेच म्हणता येईल.



# नांदेड जिल्ह्यात निर्माण झालेल्या व्हीपीके बँकेचे नांव चांदा ते बांदा पर्यंत पोहचलय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**







लोणावळा येथे बँको ब्लू २०२४ ह्या पुरस्कारांचा सन्मान स्वीकारताना संस्थेचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजी व सन्माननीय संचालक, कर्मचारी वृंद स्व. डॉ. शंकरराव चव्हाण व कै श्यामरावजी कदम साहेब,यांनी या नांदेड जिल्हात पूर्वीच्या कार्यकाळात सहकार वाढविला पण आज त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत व्हीपीके पतसंस्थेचे चेअरमन मा मारोतराव व्यंकटराव पाटील कवळे गुरुजी यांनी सहकार कसा असतो त्याला जिवंत ठेवण्याच काम करताना दिसत आहे कवळे गुरुजी यांचा जन्म सिंधी तालुका उमरी जिल्हा नांदेड येथे दिनांक,१/१/१९६६ ला एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अवघ्या ५६ हजार ५०० पाचशे इतक्या छोट्या रकमेच्या शेअर्सपासून २००२ साली उभी केलेली हीच ती पतसंस्था कै व्यंकटराव पाटील कवळे बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित सिंधी..

मराठवाड्यासारख्या कोरड व्हाऊ शेती असलेल्या दुष्काळी भागात शेतीच्या पिकातून फारसे उत्पन्न मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांच्या नशिबी कर्जबाजारी पणा येतो आणि आत्महत्येला सामोरे जावे लागते, मारोतराव कवळे गुरुजी यांच्या मनावर खूप खोलवर परिणाम झाला यातून मार्ग काढण्यासाठी एखादा जोडधंदा शेतकऱ्याकडे असल्यास त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार नाही या हेतूने त्यांनी साईकृपा दूध डेरी ची स्थापना केली पतसंस्थेच्या मार्फत लोकांना लवकर कर्ज उपलब्ध व्हायला लागले त्यामुळे लोकांनी मोठ्या प्रमाणात गाई म्हशीची खरेदी केली दुग्ध व्यवसायाला चांगलीच संधी निर्माण करून दिली या पतसंस्थेमार्फत अनेक महिला बचत गटांना कर्ज देऊन त्यांना उद्योग सुरू करायला प्रोत्साहित केले तरुणांना कोल्हापूर व पुणे येथे दुग्ध व ऊस विकासावर प्रशिक्षणासाठी पाठवले जाते प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना कर्ज देऊन व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन दिले जाते अनेक तरुणांना किराणा कापड आडत इत्यादी धंदा करण्यासाठी अनेक बाबीसाठी पतसंस्थे कडून कर्ज उपलब्ध करून दिल्या जाते या कर्जामुळे अनेक तरुण परिसरातील स्वतःच्या पायावर उभे राहून सन्मानाचे जीवन जगत आहेत..

पतसंस्थेने आतापर्यंत जिल्ह्यात २० शाखाचे जाळे निर्माण केले आहे पतसंस्थेने छप्पन हजार पाचशे रुपयांनी केलेली सुरुवात आज घडीला साडेतीनशे कोटी रुपयावर गेली आहे वार्षिक उलाढाल पाचशे कोटी रुपयावर पोहोचले आहे ज्यांच्याकडे बचतीचा पैसा आहे ते लोक या पतसंस्थेत गुंतवणूक करतात व जे गरीब आहेत ते कर्ज घेऊन उद्योग धंदा सुरू करतात..

एकमेका साह्य धरू सुपंथ हेच सहकार चळवळीचे मर्म आहे म्हणूनच म्हणतात..

विना सहकार नाही उद्धार..

आपल्या पतसंस्थेची बँको ब्लू २०२४ ह्या पुरस्काराने झालेली निवड हे निश्चितच आपल्या पतसंस्थेने मिळवलेल्या आणखी एका उल्लेखनीय यशाबद्दल आपले आणि आपल्या पतसंस्थेच्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन आपली संस्था सातत्यपूर्ण प्रगती करत असून हे यश तिच्या वाटचालीचे प्रतीक आहे.

# शिवसेना उ.बा.ठा गटाला खिंडाड अमृतराव शिंदे यांचा भाजपमध्ये प्रवेश

## सेनगाव येथे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**




सेनगाव तालुक्यातील वटकळी येथील रहिवासी असलेले अमृतराव नवनाथ शिंदे यांचा दि ३१ जानेवारी हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते भाजप कार्यालय सेनगाव या ठिकाणी जाहीर प्रवेश करण्यात आला अमृतराव शिंदे हे शिवसेना उ बा ठा गटामध्ये सन २००७ पासून वटकळी शाखाप्रमुख होते त्यानी शिवसेना पक्षामध्ये निस्वार्थाने काम केले होते परंतु ३१ जानेवारीला हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या कार्यावर आणि विकासावर विश्वास ठेवून अमृतराव शिंदे यांनी सेनगाव येथील भाजप कार्यालय या ठिकाणी जाहीर पक्ष प्रवेश केला आहे येणाऱ्या पंचायत समिती जिल्हापरिषेदेला नक्कीच भाजपला याचा मोठा फायदा होणार असल्याचं नागरिकाकडून बोललं जात आहे.

# उस्माननगर येथील युवक जांब येथे झालेल्या भिषण अपघात ठार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव गायकवाड**



जांब ते शिरूर ताजबंद रोडवरील मालवाहू ट्रक व दुचाकीमध्ये झालेल्या अपघातात उस्माननगर (ता. कंधार) येथील युवकांचा जागेवरच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास तालुक्यातील जांब (बु) ते शिरूर ताजबंद या राज्य महामार्गावर घडली होती , यामुळे उस्माननगर येथे हळहळ व्यक्त होत होती . उस्माननगर येथील अफरोज पठाण वय २६ वर्ष हा कामानिमित्त सासरवडीला गेला होता. परत येताना अपघात झाल्याचे समजताच उस्माननगर सुन्न झाले होते.

जांब बु, येथील मुख्य रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या पुढे जांब येथून शिरूर ताजबंदकडे जाणारा मोठा मालवाहू ट्रक (क्रमांक एमएच- २९, टी- १६९३) व दुचाकी (क्रमांक एमएच- २६, सीके- ०८५८) यांच्यात धडक झाली. दुचाकीस्वार अफरोज खुर्शीद पठाण (वय २५, रा. उस्माननगर) याच्या अंगावरून ट्रकचे मागचे टायर गेल्याने जागेवरच ठार झाला. अफरोज पठाण याच्या मृतदेहावर प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी डॉ. शमा नूरबश यांनी रात्री १० वाजता पोस्टमार्टम केले. अपघात झाल्यावर मुख्य रस्त्यावर एक तास वाहतूक खोळंबली होती. उस्माननगर येथील युवक असल्याचे सोशल मीडियावरून समजल्यावर वाऱ्यासारखी बातमी पसरल्याने हळहळ झाले. उस्माननगर येथे शनिवारी सकाळी साडेदहा वाजता येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई , आजी पत्नी असा परिवार आहे.

# पुणे येथील साहित्य सारथी काव्य वाचन स्पर्धेत जेष्ठ प्रबोधनकार 'कवी' महादेव लांडगे द्वितीय



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

पुणे येथील साहित्य सारथी कला मंच आयोजित काव्य महोत्सव साजरा करण्यात आला.या काव्य महोत्सवात राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आली.प्रथम देवेंद्र गावंडे,द्रितीय जेष्ठ प्रबोधनकार कवी महादेव लांडगे 'सर',तृतीय सौरभ आहेर उत्तेजनार्थ श्रीकांत जगताप, महेमूदा शेख या विजेत्या कवीना रोख रक्कम,सन्मानचिन्ह,सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले या काव्यवाचन स्पर्धेचे परिक्षक प्रा.डॉ.सुरेश वाकचौरे तर निवेदिका म्हणून प्रतिभा विभुते यांनी काम केले.अध्यक्ष सतिश देवपूरकर प्रमुख पाहुणे लोककवी सीताराम नरके प्रा.रुपाली अवचरे,जित्या जाली,जितेन सोनवणे प्रा.डॉ.रुपचंद धनगर,प्रा.शैलेंद्र भणगे यांच्या उपस्थितीत काव्यवाचत स्पर्धा संपन्न झाली.येथील डॉ.नानासाहेब परुळेकर विद्यालयातील ज्येष्ठ नागरिक संघ विश्रांतवाडी यांच्या सभागृहा मध्ये जेष्ठ प्रबोधनकार 'कवी' महादेव लांडगे सरांचे काव्य कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य ठरले.

# केंद्रप्रमुख नामदेव राठोड याचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर | योगेश चव्हाण**

किनवट माहूर तालुक्यातील रहीवाशी प्रसिद्ध प्रवक्ता, समाज सुधारक आदरणीय नामदेव राठोड सर यांचा काल दि.३१जाने.२०२५ रोज शुक्रवारला सहरा मंगल कार्यालय वाई (बा) येथे सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न झाला.त्यामध्ये अनेक शाळेतील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग तसेच माहूर, किनवट तालुक्यातील थोर व्यक्ती आणि राजकीय, सामाजिक व्यक्तीची उपस्थिती होती.

# ग्रामविकास अधिकारी व्यंकट पाटील हांडे यांचा कार अपघातात दुर्दैवी मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंडे**



नायगाव तालुक्यातील मौजे मुगांव येथे व्यंकट हांडे हे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत होते. यांचा दि. ३१ जानेवारी रोजी रात्री १०वाजता कार अपघातात मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना नांदेड जवळ आसना नदीच्या फुलाजवळ घडली.

प्राप्त माहितीनुसार, हांडे पाटील व त्यांचे चार मित्र आपल्या कारने नांदेडकडे जात असताना त्यांच्या वाहनाचा ताबा सुटला आणि कार आसना नदीच्या उडान फुलावरून खाली कोसळली व त्यांच्या डोक्याला जोरदार धडकेमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य हाती घेतले आणि पोलिसांना कळवले. व्यंकट पाटील हांडे हे मूळचे बिलोली तालुक्यातील मौजे बामणी येथील रहिवासी होते त्यामुळे त्यांचे अंत्यविधी दिनांक एक फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी साडेचार वाजता करण्यात आली आहे हांडे यांच्या पश्चात आई-वडील भाऊ-बहीण पत्नी, मुलं असा मोठा परिवार आहे अंजनीचे माजी सरपंच दिगांबर पाटील हांडे यांचे ते पुतणे होते.

त्यांच्या अचानक जाण्याने गावात शोककळा पसरली आहे.

# मनासह बुद्धि भगवंताला अर्पित केली तर भक्ती श्रवनात मनाला तल्लीन होते-प्रा.मुंढे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील मुंडेवाडी येथे दि,१ फेब्रुवारी रोज शनिवारी अखंड हरिनाम सप्ताहात प्रवचनात बोलताना ह.भ.प.प्रा.अण्णाराव मुंढे महाराज म्हणाले कि पृथ्वी,आप,तेज,वायू,आकाश, मन,बुद्धी,चित्त,अहंकार हे भगवंताच्या प्रकृतीचे भेद असून भगवंताच्या प्रकृतीला परा प्रकृती म्हणतात. जी कार्यकारी आपली प्रकृती आहे,तिला अपरा प्रकृती म्हणतात. भगवंताची परा प्रकृती जीवात्मक असते ती जगाला धारण करते.

केवळ आपल्या शरीरात परा प्रकृती आहे म्हणून आपण हे जगत जाणू शकतो. मन आणि बुद्धी भगवंताला अर्पित केल्यास केल्याशिवाय भक्ती होत नाही श्रवणात मनतल्लिन केल्याशिवाय परा आणि अपरा या दोन प्रकृती एकरूप एकरस बनत नाहीत.म्हणून मनासहबुद्धी भगवंताला अर्पित करून भक्ती करावी तर श्रवनात मनाला तल्लीन करून ज्ञानाची प्राप्ती करावी असे प्रतिपादन मुखेड येथील शहरांना भाऊ साठे महाविद्यालयातील भौतिकशास्त्री विभाग प्रमुख शिक्षण रत्न सद्गुरु श्रीहरी भक्त प्रा.मुंढे महाराज यांनी केले. मुंडेवाडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात प्रवचनात बोलत होते.पुढे बोलताना मुंढे महाराज म्हणाले की,मन आणि बुद्धीचे स्वामी स्वतः भगवंत आहेत त्यामुळे ती भगवंताच्या आधी आहे .ज्याचं आहे त्याला दिलं की तेथे आपले काहीही उरत नाही जे उरते ते भगवंताचेच उरते. जगाच्या उत्पत्ती स्थिती आणि लय या शक्तीच्या परिणाम स्वरूपाने दिसणारी शक्ती, पाण्यातील रस,चंद्र,सूर्यप्रकाशातील प्रकाश, आकाशातील शब्द,पुरुषातील पुरुषार्थ,पृथ्वीवरील मूळ सुगंध, अग्नि व तेजस्वी लोकांतील तेज,बलवानातील बल बुद्धिमानातील बुद्धीचा विवेक ह्या सर्व भगवंताच्या शक्ती आहेत.संशयी व्यक्तीचा नाश करणे, निसंशय व्यक्तीला अविनाशी ठेवणे हजारो मनुष्यामध्ये एखाद्याला सिद्धी प्राप्त होणे,या सर्व भगवंताच्या कृपेचा परिणाम असतो.ज्याला ह्या सिद्धी प्राप्त होतात तोच भगवंताच्या तत्वाला जाणू शकतो दुसरा नाही असे म्हणाले. प्रस्तुत प्रवचनासाठी कंधार,मुखेड,लोहा इत्यादी तालुक्यांतून अनेक भाविकभक्त उपस्थित होते.शेवटी पसायदानाने कार्यक्रमांची सांगता करण्यात आली.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904